IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 5.731
Volume 2, Issue 7, January 2022

# बोलींच्या अभ्यासाची गरज व महत्त्व.......

सहा. प्रा. सौ. स्वाती नवनाथ पवार
M. A. B.Ed (मराठी विभाग)
एम. एम.जगताप महाविद्यालय, महाड-रायगड.

**गोषवारा...**

जगभरातले समाज संस्कृतीचे अभ्यासक म्हणतात बोली टिकल्या तर भाषा टिकतील भाषा टिकल्या तर संस्कृती टिकेल आणि संस्कृती टिकली तर समाज आणि त्याची वैशिष्ट्यपूर्ण मूल्य व्यवस्था टिकून राहील. बोलीभाषा म्हणजे काय उदाहरण देऊन सांगायचे, तर महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या मूलखातून बोलली जाणारी स्थानिक भाषा म्हणजे बोलीभाषा. उदाहरणार्थ कोकणी अहिराणी खानदेशी, वऱ्हाडी, वैदर्भी, मराठवाडी, सोलापूर सातारकडची बोली, मालवणी इत्यादी. या बोलींमधून पिढ्यान पिढ्यांपासून प्रचलित असलेली कितीतरी लोकगीते, वाक्प्रचार, म्हणी त्या त्या मुलाखातल्या बोलींचे वेगळेपण तर दाखवतातच. त्याशिवाय त्यातून व्यक्त होणारी भूमिनिष्ठ लोकसंस्कृती कुळाच्या आणि चालीरीतींची वैशिष्ट्ये सुद्धा तितक्यात समर्थपणे व्यक्त करतात. महाराष्ट्रातील जीवनमानाचे पारंपारिक साधन म्हणजे शेती. मग शेती बद्दलची गाणी स्त्री गीते जात्यावरच्या ओव्या घराणे उत्सव दशावतारी पात्रांचे संवाद व तमाशातील मावशी किसना यातून गवळणीचे संवाद वग यातून त्या त्या प्रदेशातील संस्कृतीचे मूर्तीमंत दर्शन होत राहते.

**बीज शब्द-** लोक संस्कृती, समाज, परंपरा अभ्यासक.

**बोलींच्या  व्याख्या....**

**तर्कतीर्थश्रीलक्ष्मणशास्त्रीजोशी विश्वकोशखंड11 क**

ज्या व्यक्ती समूहाला आपण पूर्णपणे एकरूप असे भाषिक रूप वापरतो असे वाटते त्याची भाषा म्हणजे बोली येथे व्यक्तीसमूह व त्यांची भाषा याला गृहीत धरून व्याख्या केल्याचे दिसते.

**ना.गो. कालेलकर**

बोली हे दैनंदिन व्यवहाराचे स्वाभाविक साधन आहे. परिस्थितीला अनुरूप अशा भाषिक सामग्रीचा ती उपयोग करते. मुखपरंपरेने आल्यामुळे तिच्या अंगी एक प्रकारचा जिवंतपणा असतो. जी साधी पण परिणामकारक असते आपले रूप प्रतिष्ठेच्या आरशात पाहून इतरांना ते आकर्षक असे करण्याचा प्रयत्न करायला तिला वेळ नसतो. तिची स्वाभाविकता हेच तिचे वैशिष्ट्य .काहींना ते मोहक वाटेल काहीना ओंगळ वाटेल हा ज्यांच्या त्याच्या मनोवृत्तीचा आणि संस्काराचा प्रश्न आहे.

**स.ग. मालशे**

एखाद्या विशिष्ट लोकसमुदायातील किंवा भौगोलिक प्रदेशातील व्यक्तीच्या अंघोळणी पडलेले आणि त्यामुळे प्राय मुद्दाम शिकावे न लागणारे व विचारांची देवाण-घेवाण करण्यासाठी सहजगत्या उपयोगी पडणारे ध्वनी रूप साधन म्हणजे बोली.

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 5.731

Volume 2, Issue 7, January 2022

**विजयाचिटणीस -माडगूळकर.**

बोली म्हणजे परभाषकांना जवळजवळ पूर्णपणे कमी अधिक प्रमाणात सारख्या वाटणाऱ्या तदभाषकांना पूर्णपणे एकरूप वाटणाऱ्या व्यक्ती भाषकांचा समूह होय.

**दत्तात्रेय पुंडे**

एक भाषिक समाजाच्या एका गटाकडून किंवा एका भाषिक समाजाच्या एखाद्या विशिष्ट प्रदेशातील लोकांकडून देवानघेवाणीसाठी दैनंदिन व्यवहारासाठी वापरल्या जाणाऱ्या विशिष्ट भाषिक रूपात बोली असे म्हणतात.

**सोनाली देशपांडे- गुजर**

बोलीभाषा या आजच्या काळातील नवीन तर शेकडो वर्षाच्या प्रवासातून व्यवहारात विकसित झालेले आहेत. त्यामुळे बोलीभाषा या तिथल्या समाजाची आणि प्रदेशाची अभिव्यक्ती आहे.

**डॉ. मु.श्री कानडे.**

एक भाषक समाजाच्या एका गटाकडून किंवा एक भाषक समाजाच्या एखाद्या विशिष्ट प्रदेशातील लोकांकडून देवानघेवाणीसाठी  दैनंदिन व्यवहारासाठी वापरल्या जाणाऱ्या विशिष्ट भाषिक रूपास बोली म्हणता येईल.

**बोली भाषेचे महत्व....**

भाषा आणि समाज एकमेकांशी अगदी निकटतेने बांधलेले असतात. समाजातील बदलांबरोबर भाषेतही बदल घडत असतात. नवे शब्द तयार होणे. जुने शब्द वापरातून निघून जाणे. परक्या भाषेतून शब्द स्वीकारणे. जुन्या शब्दांना नवे अर्थ दिले जाणे .ही सतत घडत असलेली क्रिया आपणास दिसून येते.

**धार्मिक कार्यातील बोली...**

निरनिराळ्या भौगोलिक प्रांतात वेगवेगळे धर्म उदयास आले. या धर्मातील पूजाविधी,चालीरीती, प्रार्थना पद्धती, संस्कार इत्यादी बाबतीत भिन्नता आढळते. हे त्यांच्या भाषा व बोलीवरून समजू शकते महाराष्ट्रात धार्मिक क्रिया कर्माचा पगडा फार पूर्वीपासून आहे. विविध देवदेवता, भूतपिशाच्च, पाप पुण्य, पुनर्जन्म या विषयाच्या समजुती, यात्रा, सण,समारंभ ,प्रसंगी म्हटली जाणारी गीते ,देवतांना संतुष्ट करण्यासाठी म्हणले जाणारे मंत्र आवाहने ग्रंथ पठण आजही चालू आहेत जय जय राम कृष्ण हरी, बोला बजरंग बली की जय, हर हर महादेव, भम भम भोले, सुंबरान मांडलं, गोंधळ मांडला देवांना गोंधळाला यावे, ज्योतिबाच्या खंडोबाच्या नावानं चांगभलं, येळकोट येळकोट जय मल्हार ,आशा वाक्यावरून परंपरेने चालत आलेल्या बोली भाषेच्या खुणा लक्षात येतात.

**राजकारणात बोलींचा वापर....**

प्रत्यक्ष क्षेत्रातील भाषेची काही खास वैशिष्ट्ये असतात .आणि या दृष्टीने राजकीय क्षेत्रात भाषेचा उपयोग कसा केला जातो हे पाहणे मोठे उद्बोधक आहे .भाषा हे एक महत्त्वाचे साधन आहे. आणि म्हणून सध्या पूर्ततेसाठी राजकीय क्षेत्रात जाणारे नेते भाषेचा उपयोग प्रभावीपणे करतात.

**प्रसार माध्यमातील बोली...**

एकविसाव्या शतकात विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा झपाट्याने  विकास झाला. प्रसार माध्यमांचा विस्तार वेगाने झाला सामाजिक संपर्क माध्यमे जनसामान्यांच्या हातात आली. ज्ञान, माहिती, मनोरंजन ,जाहिरात आणि प्रबोधन हे घटक फक्त प्रसार माध्यमांची मक्तेदारी न राहता ती आबाल वृद्धांपासून समाजातील सर्व घटकांची संपर्कस्थाने बनली. महाजालाचे अनन्यसाधारण महत्त्व माणसाला स्वीकारावे लागते या महाजालावर स्वतःची नाममुद्रा टिकवण्याची संधी प्रत्येकाला प्राप्त झाली. वेगवेगळ्या 'ब्लॉग' किंवा 'अनुदिनी' च्या माध्यमातून लोक आपापल्या बोलींचा वापर करू लागले.

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 5.731

Volume 2, Issue 7, January 2022

**बोलींच्या अभ्यासाची गरज...**

भाषा किंवा बोलली हे समाजाचे प्रतिबिंब असते. समाजाला काय वाटते त्याचे एखाद्या विषयात काय मत आहे इत्यादी सर्वच प्रश्नांची उत्तरे भाषा अथवा बोलीतूनच मिळतात . कोणत्याही सामाजिक प्रश्नांचे उत्तर शोधायचे असेल तर बोलींचा अभ्यास करणे क्रमप्राप्त असते. प्रारंभीच्या काळातील जगातील सर्वच संशोधक मग ते समाजशास्त्राचे असो अथवा मानव वंश शास्त्राचे इतिहासाचे असो किंवा राज्यशास्त्राचे भाषेचे अभ्यासक होते किंवा आपल्या विषयाचा सखोल अभ्यास करण्यासाठी त्यांना भाषेचाही सखोल अभ्यास करावा लागला. सामाजिक व सांस्कृतिक मानसशास्त्र समाजशास्त्र मानव जातीशास्त्र शिक्षण शास्त्र मनोविज्ञान इत्यादी ज्ञान शाखातील संशोधकास प्रत्यक्ष क्षेत्रामध्ये जाऊन निरीक्षणे व टिपणी करणे आवश्यक्य ठरते. अशावेळी अध्ययनाचा विषय झालेल्या समाजाच्या बोलीचे ज्ञान त्या त्या परीने उपयुक्त ठरते. विशेषतः लोकसमूहाचे सामाजिक आणि सांस्कृतिक वर्तन आणि त्याचा आशयाच्या संरचनेची व घाटाशी असलेला अन्य अन्य संबंध याचे ज्ञान भाषेवरील प्रभुत्वा शिवाय अशक्य होय. लोकसमूहाचे संस्कृती सामाजिक व आर्थिक संघटन ज्ञान श्रद्धांजली इत्यादी विषयक माहिती संकलित करून त्यांच्या समस्यांचा अभ्यास करणे व त्यावर उपाय शोधणे बोलीच्या अभ्यासाने सुकर होते. त्याचबरोबर त्या त्या प्रदेशाची भाषक ध्येय धोरणे ठरवणेही सोपे जाते. अलीकडे झालेल्या एका पाहणीत जगात सुमारे 7000 इतक्या भाषा असल्याचे आढळून आले आहे .यातील अनेक भाषांची त्यांच्या नावापलीकडे कोणतीही माहिती नाही. भारतातील बोलींची संख्या पंधराशे होऊनही अधिक आहे गुजरात मधील 'डांग' मध्य. प्रदेशातील 'बैतुल' बालाघाट छत्तीसगडमधील 'बस्तर, वगैरे विभागातील मराठी बोलींची आजची अवस्था काय आहे, याची माहितीही मिळू शकत नाही. महाराष्ट्रातील आदिवासींच्या महादेव माडीया, राजगोंड, आंध, कोलम परधान, हळवा, कवार इत्यादी आदिवासी जमातींच्या भाषांचे संशोधन होऊन त्यांची व्याकरणे लिहिली जाणे शब्दकोश तयार होणे व लोकसाहित्याचे संग्रह होणे या अत्यंत निकडीच्या गोष्टी आहेत या कृती मराठी भाषेत झाल्यास त्या बहुसंख्य वाचकांपर्यंत पोहोचून आदिवासींच्या समाज आणि संस्कृतीची ओळख त्यास होणे शक्य आहे. शिवाय उपेक्षितांच्या अंतरंगाची ओळख झाल्याने त्यांच्या प्रगतीसाठी प्रयत्न होणे ही शक्य आहे. आदिवासीं बरोबरच वंजारी, फासेपारधी, कैकाडी ,भोई, वडार इत्यादी भटक्या जमातींच्या भाषांचाही अभ्यास होणे जरुरीचे आहे .वाढता शिक्षण प्रसार, नागरी जीवनाची ओढ व बदलती सामाजिक मूल्य यामुळे आदिवासी भटक्या जमाती व दलित वर्ग यांच्या जीवनात आज महान उलथापालत होऊ पाहत आहे .त्यांची राहणी ,विचारसरणी आशा आकांक्षा व जीवनमूल्य अमलाग्र बदलत आहेत या सर्वांचा परिणाम त्यांच्या भाषांवर होणे अपरिहार्य आहे. विशेषतः बलवान सामाजिक गटात दुर्बल सामाजिक गट विरून गेल्याने आज अनेक बोली नाममात्र राहिले आहेत; तर अनेक नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत .त्यामुळे व्याकरण, शब्दकोश, गद्यपद्यपाठ संग्रह इत्यादीद्वारे त्यांच्या स्वरूपाविषयीच्या माहितीचे संकलन संशोधन व जतन होणे ही आजची निकड आहे. एका परीने बोलींचा अभ्यास हा भाषा विज्ञानाच्या प्रगतीसही हातभार लावत असतो भाषांच्या संरचनेतील साधर्म्य व वैधर्म यांची माहिती मिळवण्याचे ते एकमेव साधन आहे. या माहितीच्या आधारावर भाषेच्या सार्वत्रिक वैशिष्ट्यांचे ज्ञान होऊन भाषेसंबंधी तात्विक विचाराची प्रगती होते .या दृष्टीने बोलींच्या अभ्यासाचे क्षेत्र म्हणजे भाषा विज्ञानाची प्रयोगशाळाच होय.

**निष्कर्ष....**

मराठी अनेक बोलीपासून संस्कारित असल्याने अनेक बोलींनी मराठीला समृद्ध केलेली दिसते. छत्रपती शिवाजी महाराजांनी म्हणूनच स्वतःचा राज्यव्यवहार कोश तयार करून बोलींना टिकवण्याचे महत्त्वपूर्ण पाऊल उचलले होते .प्रदेशानुसार बोलल्या जाणाऱ्या बोली संस्कृती टिकून आहेत कोणत्याही प्रदेशाची संस्कृती अधिक वैभवशाली करायची असेल तर बोलींचे संवर्धन करणे गरजेचे आहे. बोली टीकली तरच भाषेची समृद्धी वाढत जाईल .मराठीत आलेले देशी शब्द आणि त्यामागील परंपरा बोलींच्या गर्भात दडलेली आ.हे परंतु आजकाल मराठीत परकीय भाषेचे उदातीकरण केले जात असून बोलीला तुच्छतेचा फटकारा लावणारी मानसिकता बळवताना दिसते आहे.

**संदर्भ ग्रंथ**

[1]. भाषा समाज आणि संस्कृती--- सोनाली देशपांडे गुजर.
[2]. बोली भाषांचाअभ्यास सु. बा. कुलकर्णी.
[3]. आधुनिक भाषा विज्ञान -संपा. कल्याण काळे, अंजली सोमण प्रतिमा प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती.२००३
[4]. मराठीच्या प्रमुख बोलीस. ग. मालशे.
[5]. वरखेडे रमेश- समाज भाषा विज्ञान प्रमुख संकल्पना, शब्दालय प्रकाशन, दुसरी आवृत्ती २००१